महाराष्ट्र पोलीस

# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र




०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४३७ /२०१८ पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक १७/०८/२०१८

## विशेष वार्तापत्र

## विविध गुन्हयात ५ आरोपी अटक

## भंडारा जिल्हा पोलीसांची कार्यवाही

१) **पोलीस स्टेशन साकोली** अपराध क्र. २८२/२०१८ कलम ३७९ भादवी मधील रफिर्यादी हा शाळेचा बांधकाम सुरु असल्याने शाळेतुन उशीरा घरी येऊन आपली डि. ओ. डिलक्स कंपनीची पांढऱ्या रंगाची मोटार सायकल क्रमांक एम.एच. ३५/एचपी/एबी– ६६३२ ही घराचे वालकंम्पाऊडचे लोखंडी गेटचे बाहेर रस्त्याचे कडेला हॅडल लॉक करुन न करता उभी ठेवुन घरी हजर होता. तेव्हा मुलगा समीर हा फिर्यादीचा आईला डब्बा पोहचवुन घरी परत आला तेव्हा वडीलाला मोटार सायकल नाही असे सांगीतल्याने फिर्यादीने पाहीले असता मोटार सायकल दिसली नाही. मोटार सायकल किमती २५,०००/–रु. ची चोरुन नेणारे गुन्हयातील आरोपी नामे १) शोरब कमलकुमार सोनकुसरे रा. साकोली, २) नितेश गजानन इलमकर, रा. सातलवाडा, यांना सदर गुन्हयात दिनांक १७/७/२०१८ अटक करण्यात आली असुन यांनी २ मोटार सायकल चोरी केल्याचे सांगत असुन पिसीआर घेवुन तपास करण्यात येत आहे. गुन्हयाचा तपास पोहवा. माधव निलकंठ परशुरामकर करीत आहेत.

२) **पोलीस ठाणे जवाहरनगर** अपराध क्र. १५५/१८ कलम ३५४(अ),५०६भादवि. सहकलम ८,१२ बालकांचे लैगिंक अपराधापासून सरक्षंण २०१२ या गुन्हयात फिर्यादीला आरोपीने हात पकडून व कमरेला पकडून ओढतान करुन विनयभंग केला पिडीत फिर्यादी व तिच्या आई वडीलांना पाहुन घेण्याची धमकी दिली. यातील गुन्हयातील आरोपी नामे स्वप्नील नरेश डोंगरे, वय १९ वर्ष, रा. गांधी वार्ड पे. पंप ठाणा यांना सदर गुन्हयात दिनांक १७/८/२०१८ चे ००.१३ वा. अटक करण्यात आली असुन गुन्हयात आरोपीस पोलीस कोठडी देण्यात आलेली असुन गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक सतिश गंगाराम खेडेकर करीत आहेत.

३) **पोलीस ठाणे पवनी** अपराध क्र. २२१/१८ कलम ३६३,३४ भादवि. दोन्ही आरोपीतांनी अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेतांना मिळुन आल्याने त्यामधील आरोपी नामे १) कुलदिप भगवान ईटानकर, वय २० वर्ष २) प्रेमकुस भगवान ईटानकर वय २६ वर्ष दोन्ही रा. शिवनाळा यांना सदर गुन्हयात दिनांक १७/८/२०१८ चे ००.३५ वा. अटक करण्यात आली असुन गुन्हयात आरोपीस पोलीस कोठडी देण्यात आलेली असुन गुन्हयाचा तपास महिला पोलीस उपनिरीक्षक अनुराधा फुकट करीत आहेत.

(जितेंद्र के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.